# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा

ग्रामीण शिक्षण संस्था (रुरल इन्स्टीट्यूट) द्वारे राबविण्यात येणारा

# कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रम

***(Diploma in Agricultural Science)***

**प्रवेश माहिती पुस्तिका**

## शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६

**(२ वर्षे कालावधी - इंग्रजी माध्यम)**

**किमंत रु. ५००/– (खुला वर्ग) रु. २५०/– (आरक्षित वर्ग)**

आवेदन अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख –०१/०७/२०२५

ई-मेल : adlae@pdkv.ac.in
दूरध्वनी : 0724-2258706
वेबसाईट : pdkv.ac.in

दि. ०२/०६/२०२५ रोजी प्रकाशित.

## विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी

| अ.क्र. | पद | नांव | कार्यालय दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|
| १. | कुलगुरु | डॉ. एस. एस. गडाख | (०७२४) २२५८३६५ |
| २. | संचालक (शिक्षण) | डॉ. एस. एस. माने | (०७२४) २२५८०९३ |
| ३. | अधिष्ठाता (निम्न कृषि शिक्षण शाखा) | डॉ. आर. एन. काटकर | (०७२४) २२५८७०६ |
| ४. | सहयोगी अधिष्ठाता (निम्न कृषि शिक्षण शाखा) | डॉ. आर. एन. काटकर | (०७२४) २२५८७०६ |
| ५. | सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) | डॅा. आर. एम. गाडे | (०७२४) २२५८५५० |
| ६. | प्राचार्य ग्रामीण शिक्षण संस्था, कृषि विज्ञान शाखा, पिपरी वर्धा | डॉ. आर. ए. हवा | ७९७२७३२६२७ |
| ७. | प्राचार्य ग्रामीण शिक्षण संस्था, कृषि विज्ञान शाखा, अमरावती | श्री. ए. एच. ढोबळे | (०७२१) २६६०८२३ |
| ८. | कुलसचिव | डॉ. एस. के. ठाकरे | (०७२४) २२५८३७२ |
| ९. | उपकुलसचिव (वि. वि.) | डॉ. एस. के. ठाकरे | (०७२४) २२५९२४८ |

प्रकाशक :

कुलसचिव
डॉ. पं. दे. कृ. वि.
कृषिनगर, अकोला–४४४१०४.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला (महाराष्ट्र)

## कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रम

## *(Diploma in Agricultural Science)*

कृषि विज्ञान पदविका हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याशी संलग्न असून पुढील संस्थामध्ये शिकविल्या जातो.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व दुरध्वनी क्रमांक | प्रवेश क्षमता | ज्या विभागातील रहिवाश्यांसाठी प्रवेश मर्यादीत आहे त्या राजस्व विभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | ग्रामीण शिक्षण संस्था<br>(कृषि विज्ञान शाखा) पिपरी, वर्धा<br>दुरध्वनी (०७१५२) २३०५२२ | ४० | नागपूर विभाग, (नागपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे) |
| २. | ग्रामीण शिक्षण संस्था,<br>(कृषि विज्ञान शाखा) अमरावती<br>दुरध्वनी (०७२१) २६६०८२३ | ४० | अमरावती विभाग (यवतमाळ, अमरावती, वाशीम, अकोला व बुलढाणा जिल्हे) |

**१. इतर माहिती व प्रवेशासंबंधी महत्वाच्या सुचना :**

१. अभ्यासक्रमाची मुदत : दोन वर्ष

२. प्रवेशाकरीता पात्रता : १० वी शालांत परिक्षा (एस.एस.सी.) किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण.

३. शिक्षणाचे माध्यम : इंग्रजी

४. अभ्यासक्रम संपल्यावर मिळणारी उपाधी : '' कृषि विज्ञान पदविका ''

५. परिक्षा पध्दती : वार्षिक

उमेदवार अमरावती राजस्व विभागातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम व अकोला या जिल्हयातील कोणत्याही शाळेतून शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण झाला असेल किंवा या जिल्हयातील शेतीचा ७/१२ चा उतारा असेल किंवा त्या जिल्हयातील रहीवाशी असेल तर त्याला ग्रामीण शिक्षण संस्था (कृषि विज्ञान शाखा) अमरावती येथेच प्रवेश मिळेल. तसेच उमेदवार नागपूर राजस्व विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयातील कोणत्याही शाळेतून शालांत परीक्षा(एस.एस.सी.) उत्तीर्ण झाला असेल किंवा या जिल्हयातील शेतीचा ७/१२ चा उतारा असेल किंवा त्या जिल्हयातील रहीवाशी असेल त्याला ग्रामीण शिक्षण संस्था (कृषि विज्ञान शाखा) वर्धा येथेच प्रवेश मिळेल. उमेदवाराला त्याकरीता रहीवाशाचे प्रमाणपत्र (डोमेसिल सर्टिफिकेट) जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराचे वय **०१.०७.२०२५ रोजी १४ ते ३०** वर्षाचे दरम्यान असावे. प्रवेश गुणवत्तेवर आधारीत तसेच विद्यापीठाने व शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल.

| अ. क | ग्रामिण शिक्षण संस्था नांव व दुरध्वनी कंमाक | राजस्व विभागाचे नाव | ईमेल |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण शिक्षण संस्था<br>(कृषि विज्ञान शाखा) पिपरी, वर्धा<br>भ्रमणध्वनी – ७९७२७३२६२७ | नागपूर विभाग (नागपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे) | **riagripipri@gmail.com** |
| २ | ग्रामीण शिक्षण संस्था<br>(कृषि विज्ञान शाखा) अमरावती<br>दूरध्वनी (०७२१) २६६०८२३ | अमरावती विभाग (यवतमाळ, अमरावती, वाशीम, अकोला व बुलढाणा जिल्हे) | **agririamt1956@gmail.com** |

१) उमेदवाराने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या **www.pdkv.ac.in** या संकेतस्थळावरून (वेबसाईट) माहितीपत्रक व प्रवेश अर्ज डाऊनलोड करावे.

२) ज्या राजस्व विभागामध्ये अर्ज सादर करावयाचा आहे त्या विभागातील ग्रामीण शिक्षण संस्थेच्या निर्देशीत केलेल्या ईमेल वर उमेदवाराने प्रवेश अर्जासोबत अर्ज शुल्क भरल्याची पावती व प्रवेश अर्ज संपुर्ण कागदपत्रे स्कॅनीग करून पाठवावे.

३) **प्रवेश अर्ज शुल्क –खुले उमेदवारांसाठी रू.५00/–(रुपये पाचशे फक्त) तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रू. २५0/– (रुपये दोनशे पन्नास फक्त) प्रवेश अर्ज शुल्क आहे.** सदरचे शुल्क धनाकर्ष, सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण,डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांचे नावे काढून ऑनलाईन पध्दतीने किंवा आर.टी.जी.एस. (RTGS) ने सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांचे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा– डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला येथिल खाते क्र. **10428433117,** IFSC Code-SBIN0002171 या खात्यावर आर.टी.जी.एस.ने पाठवून प्रवेश शुल्क भरल्याची पावती प्रवेश अर्जासोबत स्कॅनीग करू जोडावी.

४) माहिती पत्रकामधील निर्देशीत केलेले कागदपत्रे अर्जासोबत जोडावे.

५) ज्या उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करणे शक्य नसेल, त्या उमेदवारांनी **www.pdkv.ac.in** या संकेतस्थळावरून (वेबसाइट) महितीपत्रक व प्रवेश अर्ज डाउनलोड करून सदर अर्ज पूर्ण भरुन आवश्यक ते कागदपत्रे प्रमाणित (Attested) करुन अर्ज शुल्काचे धनाकर्ष सहयोगी अधिष्ठाता, नि.कृ.शि.,डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे नावे काढून किंवा **आर.टी.जी.एस. (RTGS)** ने भरलेल्या शुल्काची पावती जोडुन संबंधित राजस्व विभागातील ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा/अमरावती यांना व्यक्तिश: पोहचवुन देवुन पोच पावती घेता येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविता येईल. मात्र शेवटच्या तारखेपर्यंत अर्ज प्राप्त न झाल्यास अर्ज ग्राह्य धरता येणार नाही,याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६) स्कॅन करून ईमेल व्दारे सादर केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत याची खातरजमा करून कागदपत्रे संलग्न राजस्व विभागाच्या ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा / अमरावती यांना सादर करावीत. सादर केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

७) प्रवेश अर्जासोबत संपुर्ण कागदपत्रे न जोडल्यास, अर्ज शुल्क न भरल्यास अथवा अर्ज शुल्क भरल्याची पावती अर्जासोबत न जोडलेले प्रवेश अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

८) प्रवेश अर्जाची प्रत किंवा इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने सहयोगी अधिष्ठाता, नि.कृ.शि.यांचे कार्यालय, किंवा कृषी विद्यापीठ अकोला कागदपत्र पोष्टाव्दारे पाठवु नयेत. अश्या प्राप्त अर्जांना ग्राहय धरल्या जाणार नाही.

**२.प्रवेश अर्ज शुल्क**

खुले उमेदवारांसाठी रू. ५००/– तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रू. २५०/– प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क धनाकर्ष, सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावे काढावे.सदचे शुल्क ना परतावा आहे.

**३. प्रवेशाबाबत राखीव जागांचा तपशिल :**

उमेदवाराची निवड विहीत केलेल्या राखीव जागा लक्षात घेउन गुणवत्ता वर्गवारी व शासन निर्णय क्र. टिईएम/१५९४/(६३२३)/तांत्रिक शिक्षण–१ दिंनाक ३ जून १९९४ तसेच शासन निर्णय क्र. CBC/1094/PK/86/MAVAK9 दिनांक १६.०६.९४ अन्वये ठरविलेल्या नियमानुसार

केली जाईल, तसेच शासन क्र. AGU-2195/CR-73/19-A दिंनाक ३.०१.२००१ नुसार निम्न कृषि शिक्षणाअंतर्गत येणा–या विविध अभ्यासक्रमाच्या (पदविपूर्व) प्रवेशासाठी खाली दर्शविलेल्या प्रत्येक प्रवर्गात ३० टक्के जागा महिला/विद्यार्थीनीसाठी आरक्षित असून त्यावर गुणानुक्रमे प्रवेश देण्यात येईल.

गुणवत्ता यादी प्रवेश प्रक्रीया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहील्यास, त्या जागेवर शासन निर्णय क्र. TEM-

३३९७/१२९२६/(९०८६) TE-I दिनांक ११.०७.१९९७ नुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत विशेष मागासवर्गीय (SBC) उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. तसेच रिक्त जागांवर विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर काही जागा रिक्त राहील्या तर त्या जागा वरील शासन निर्णयानुसार इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात येतील.

**संवैधानिक आरक्षण :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती (बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्तिसह) | :– | १३ टक्के |
| २) | अनुसुचित जमाती | :– | ७ टक्के |
| ३) | विमुक्त जाती (अ) (१४ तत्सम जाती) | :– | ३ टक्के |
| ४) | भटक्या जाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | :– | २.५ टक्के |
| ५) | भटक्या जमाती (क) (धनगर व व तत्सम जमाती) | :– | ३.५ टक्के |
| ६) | भटक्या जमाती (ड) (बंजारी व व तत्सम जमाती) | :– | २ टक्के |
| ७) | इतर मागासवर्गीय | :– | १९ टक्के |
| ८) | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीय (एसईबीसी)* | :– | १० टक्के |
| ९) | आर्थिक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) | :– | १० टक्के |

**इतर आरक्षण :**

| | | | |
|---|---|---|---|
| १०) | शेतकरी/भुमिहिन शेतमजूरांची मुले | :– | ६ टक्के |
| ११) | आजी व माजी सैनिकांची मुले | :– | २ टक्के |
| १२) | प्रकल्पग्रस्तांची मुले | :– | ४ टक्के |
| १३) | स्वातंत्र्य सैनिकांची मुले | :– | २ टक्के |
| १४) | अपंग | :– | ३ टक्के |
| १५) | महिला | :– | ३० टक्के |
| १६) | अनाथ | :– | १ टक्के |

* वरील आरक्षणामध्ये प्रवेश प्रक्रियेच्या वेळेस प्रचलित शासन निर्णयानुसार बदल संभावतो.

महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण 1514/प्र.अ.100/7 अे दि.08 जुलै, 2019 अन्वये अ.क्र.11,12 व 13 मध्ये नमुद केलेले आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

**टिप :–**

अ) इतर मागासवर्गिय जाती (OBC), विमुक्त जाती–(अ) (VJ/DT-A), भटक्या जमाती–(ब) (NT-B), भटक्या जमाती–(क) (NT-C), भटक्या जमाती–(ड) (NT-D) व विशेष मागासवर्गीय (SBC) ह्या वर्गवारीसाठी उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन–क्रिमीलेअर) जोडणे आवश्यक आहे. उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन–क्रिमीलेअर) **३१ मार्च २०२६ पर्यत वैध असावे.**

ब) अनुसूचीत जाती (SC) व जमाती (ST) सोडून इतर सर्व आरक्षित प्रवर्गासाठी नॉन–क्रिमीलेअर (non-creamylayer) प्रमाणपत्र आवष्यक आहे.

क) विषेष मागास प्रवर्ग (SBC) साठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या जागेवर एकुण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विषेश मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ड) शासन निर्णय क्र. बीसीसी १०९१/२५५१/(क) १६ ब, दिनांक २६ मार्च १९९१ अन्वये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमाती परिच्छेद क्र. ३ (१) ते (६) प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, ही पदे अदलाबदलीने भरण्यात येतील.

इ) जर उमेदवार एका पेक्षा जास्त राखीव प्रवर्गात हक्क सांगत असेल, तर त्याची राखीव जागेची वर्गवारी क्रमवार (Sequence) विचारात घेण्यात येतील.

ग) आरक्षणाबाबतचे वरील नियम, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार केलेले बदल व सुधारणा विचारात घेउन लागू करण्यात येतील.

फ) परिच्छेद क्र. ३ इतर आरक्षण (१०) ते (१६) मधील वर्गवारीच्या उमेदवाराची टक्केवारी ही गुणवत्ता यादीतील उमेदवारास जमेस धरुन राहील.

ज) परिच्छेद क्र. ३ (१०) मधील शेतकरी म्हणजे ज्याची स्वतःची/कुळाची शेती असून ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन फक्त शेतीच आहे. तसेच शेतमजूरी करणारे म्हणजे ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन मजुरी आहे अशी व्यक्ती, त्यासाठी सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

ह) परिच्छेद क्र.३(११) मधील आजी-माजी सैनिक प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराने पालकाचे संबंधीत खात्याचे नोकरीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate ची प्रत अर्जासोबत जोडावी.

य) परिच्छेद क्र. ३ (१२) नुसार प्रकल्पग्रस्त प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराने पुर्नवसन अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. या सवलतीचा फायदा मिळण्याकरीता त्यात विद्यार्थ्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

र) परिच्छेद क्र. ३ (१३) मधील स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी किंवा मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी यांना खालील अटींच्या अधिन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांच्या सहीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य सैनिक यांचे खालील मुद्यांवरील रू. १००/- चे स्टॅपपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल (या शपतपत्रात स्वातंत्र्य सैनिकाने उमेदवाराशी असलेले स्वतःचे नाते उमेदवाराच्या नामनिर्देशासह स्पष्टपणे नमूद केलेले असावे).

१. उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.
२. स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.
३. स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा उपयोग आता केला तर, यापुढे कुठल्याही नातेवाईकासाठी करणार नाही.

ल) परिच्छेद क्र. ३ (१४) मधील अपंग प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

व) परिच्छेद क्र. ३ (१५) मधील महिला प्रवर्ग आरक्षण शासन निर्णय क्र. अेजीयु-२१९५/सीआर-७३/१९-अे दिनांक ३ जानेवारी २००१ नुसार एकुण जागांच्या तीस टक्के जागा महिला उमेदवारांसाठी आरक्षित आहेत.

शा) प्रत्येक उमेदवाराच्या अर्जाचा सर्वप्रथम विचार त्यांच्या गुणवत्तेवर (On Merit) केल्या जाईल.

स) प्रवेश अर्जासोबत आवश्यक सुचना जोडल्या आहेत. त्यात प्रवेशाबाबतच्या विविध तारखा व इतर आवश्यक माहीती दिली आहे. या तारखेप्रमाणे अर्ज केलेल्या उमेदवाराने प्रत्यक्ष संबंधीत संस्थेत स्वतः हजर राहून प्रवेश याद्या पहाव्यात उमेदवाराला निवडीबाबत पोष्टाव्दारे कळविले जाणार नाही व त्याबाबतची कोणतीही तक्रार स्विकारल्या जाणार नाही.

**४. अभ्यासक्रमाचा उद्येश :**

अ) शेतीच्या मुलभूत प्रक्रीयांचे ज्ञान देण्याच्या हेतूने हा अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. कृषि कार्यात रस घेणारा एक आदर्श शेतकरी निर्माण व्हावा, असा यामागील उद्येश आहे, हा अभ्यासक्रम यशस्वी रितीने पार पाडणारा विद्यार्थी देशातील विकास योजनेच्या दृष्टीने स्वतःच्या पायावर उभा राहून स्वावलंबनाने शेती हा व्यवसाय करु शकतो. त्याच प्रमाणे कृषि आधारीत उद्योग करु शकतात.

ब) ग्रामसेवक, ग्रामसहाय्यक, कृषि सहाय्यक, गटसचिव इत्यादी दर्जाच्या नोकरीकरीता उमेदवार पात्र आहे.

**५. कृषि विज्ञान पदविका धारकांना पदवी अभ्यासक्रमाकरीता विशेष सवलत :**

अ) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठान्तर्गत येणाऱ्या कृषि महाविद्यालयात बि.एससी. (कृषि), बि. एससी. (उद्यानविद्या), बि.एससी. (वनविद्या) या पदवि अभ्यासक्रमाच्या प्रथम सेमिस्टरमध्ये जे विद्यार्थी कृषि विज्ञान घेउन उत्तीर्ण होतील त्यांना प्रवेश मिळतो.

ब) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभाग, अधिसुचना दि. १५.०१.२०१८ ला अनुसरून महाराष्ट्र राज्यातील चारहि कृषि विद्यापीठा अंतर्गत, कृषि, उद्यानविद्या, वनशास्त्र हया पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेशासाठी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (MHT-CET) अनिवार्य आहे.

क) नागपूर/अमरावती विद्यापीठातंर्गत येणा–या महाविद्यालयात बि.एससी. प्रथम वर्ष जीवशास्त्र विभागात प्रवेश तसेच बि.ए./बि.कॉम प्रथम वर्ष व बि. ए. रुरल सर्व्हीसेस साठी प्रवेश मिळतो.

**६. अभ्यासक्रम आणि विषय :**

या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षाचा असून त्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने पुरस्कृत केलेले खालील विषय अभ्यासक्रमासाठी घ्यावे लागतील.

**अ) अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी २. भौतिकशास्त्र ३. रसायनशास्त्र ४. जीवशास्त्र
५. कृषि विद्या ६. उद्यानशास्त्र ७. पीक संरक्षण ८. कृषि अभियांत्रीकी
९. पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा १०. शारीरीक आरोग्य शिक्षण

**ब) ऐच्छिक विषय : (कोणताही एक गट)**

गट १ – विस्तार शिक्षण व अर्थशास्त्र अभ्यासगट
११. ग्रामीण अर्थशास्त्र १२. सामुदायिक विकास व विस्तार

गट २ – पशु संवर्धनशास्त्र अभ्यासगट
११. पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय १२. पशु वैद्यकीय विज्ञान शास्त्र

| ७. | **विद्यार्थ्याची निवड :** |
|---|---|
| अ) | प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीव्दारे केल्या जाईल.<br>त्यासाठी खालील निवड समिती नियुक्त केल्या जाईल.<br>१) कुलसचिवांचे प्रतिनिधी (सहाय्यक प्राध्यापक वा वरील दर्जाचे) – अध्यक्ष<br>२) ग्रामीण शिक्षण संस्था वर्धा/अमरावती चे प्राचार्य – सदस्य सचिव<br>३) ग्रामीण शिक्षण संस्था येथील दोन प्राध्यापक – सदस्य |
| ब) | सदर समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन ग्राहय अर्जानुसार विद्यार्थ्याची सामान्य गुणवत्ता यादी तयार करेल. |
| क) | यामध्ये नियमानुसार गुणांचा अधिभार, वैद्यानिक आरक्षण विचारात घेतल्या जाईल. |
| ड) | मुळ गुणवत्ता यादीवर निवड समितीतील सर्वाच्या स्वाक्ष–या असतील. |
| इ) | मुळ गुणवत्ता यादी संबंधी असणारी तक्रार अर्ज, विहीत शुल्क भरुन निर्धारित तारखेपर्यंत स्विकारण्यात येईल. |
| ई) | प्राप्त झालेल्या तक्रारी व विद्यार्थ्यांचे मुळ अर्जासह तक्रार निवारण समितीच्या सभेसाठी संस्थेचे प्राचार्य, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला येथे उपस्थित राहतील. |

| | | |
|---|---|---|
| प) | गुणवत्ता यादीवरील तक्रारीवर खालील समिती निर्णय घेईल.<br>१) अधिष्ठाता (कृषि) – अध्यक्ष<br>२) सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) – सदस्य<br>३) कुलसचिव – सदस्य<br>४) अधिष्ठाता (कृषि) यांनी नामनिर्देश केलेले एक सहयोगी अधिष्ठाता – सदस्य<br>५) उपकुलसचिव (वि.वि.) – सदस्य सचिव | |
| फ) | तक्रारी संबंधी तक्रार निवारण समितीचा निर्णय झाल्यानंतर, अधिभारासह गुणवत्ता/वैद्यानिक आरक्षण लक्षात घेउन अंतिम गुणवत्ता यादी व निवड यादी खालील समितीव्दारे निश्चीत करण्यात येईल.<br>१) सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण – अध्यक्ष<br>२) ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावतीचे प्राचार्य – सदस्य<br>३) उपकुलसचिव (वि.वि.) – सदस्य सचिव | |
| भ) | अंतिम गुणवत्ता यादी व निवड यादी निर्धारीत तारखेस संस्थेच्या सुचना फलकावर प्रसिध्द केल्या जाईल. | |
| ग) | निवडी बाबत उमेदवारास पोष्टाने कळविण्यात येणार नाही. | |
| | या पाठयक्रमाकरीता डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची निर्धारीत संख्या ४० असून त्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या नियमानुसार गुणानक्रमे (On Merit) प्रवेश देण्यात येईल. मागासवर्गातील विद्यार्थ्यांच्या राखीव जागा नियमानुसार भरण्यात येतील.<br>गटनिहाय विद्यार्थ्यांची संख्या पुढील प्रमाणे आहे.<br>१. विस्तार शिक्षण व अर्थशास्त्र अभ्यासगट – २०<br>२. पशु संवर्धनशास्त्र अभ्यासगट – २० | |
| ८. | **उपस्थितीचे प्रमाण :** | |
| | अंतीम परिक्षेस पात्र ठरण्यासाठी प्रत्येक विषयातील उपस्थितीचे प्रमाण कमीतकमी ८५ % असणे आवश्यक आहे त्याशिवाय विद्यार्थ्याला परिक्षेत बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही.<br>निम्न कृषि शिक्षणअंतर्गत विविध अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना सर्व शाळांच्या सोईकरीता दिवाळी सणा निमित्य आठ दिवसाची सुटी राहील. हि सुटी दिवाळीचे (लक्ष्मीपूजन) दोन दिवस अगोदर पासून सुरु होईल. | |
| ९. | **ग्रामीण शिक्षण संस्थेत प्रवेश घेतांना बाळगावयाची दक्षता :** | |
| | १. | प्रवेश अर्ज मंजूर होताच माहिती पुस्तीकेत दिलेले ग्रामीण संस्थेचे शुल्क विनाविलंब कार्यालयात जमा करावे लागेल. त्याशिवाय प्रवेश कायम केला जाणार नाही. |
| | २. | एकदा प्रवेश दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांने भरलेले शुल्क परत दिल्या जाणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| १०. | **अर्जासोबत जोडावयाचे दाखले :** | |
| | अ) | विद्यार्थी पूर्वी शिकत असलेल्या संस्था प्रमुखाच्या सहीने संस्था सोडल्याच्या प्रमाणपत्राची प्रत (सत्य प्रतिलीपी) (School leaving certificate/T.C.) |
| | ब) | उत्तीर्ण झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रिकांची सत्य प्रतिलिपी (Mark List of S.S.C./H.S.S.C.) |
| | क) | खाजगी रितीने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी संस्था प्रमुखाकडून घेतलेले चारित्र्य प्रमाणपत्र (Character Certificate) |
| | ड) | वडील/पालक यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी व राजपत्रित अधिकारी, सरपंच किंवा नगर परिषदेचे अध्यक्ष यांची सही असावी. |
| | ई) | शिक्षणात खंड पडला असल्यास, त्याबध्दलचे प्रमाणपत्र (Gap Certificate) |

**११. प्रवेश घेतांना भरावयाची फी :**

अ) सन **२०२५–२०२६** सत्राकरीता प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे फी कार्यालयात भरावी तसेच शैक्षणीक शुल्कात कोणताही बदल झाल्यास तो विद्यार्थ्यास/पालकास बंधनकारक राहील.

| अ. क्र. | सर्वसाधारण शुल्क | अनुदानित शाळेची फी आकारणी (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष |
| | **अ) शुल्क** | | |
| १. | शिक्षण शुल्क | २००००/- | २००००/- |
| २. | प्रवेश शुल्क | १०००/- | १०००/- |
| ३. | नोंदणी शुल्क | ५००/- | ५००/- |
| ४. | वाचनालय शुल्क | १००/- | १००/- |
| ५. | परिक्षा शुल्क | १२००/- | १२००/- |
| ६. | अनामत शुल्क (परत होणारी) | **१००/-*** | -- |
| ७. | सत्र शुल्क | १००/- | १००/- |
| ८. | ओळखपत्र शुल्क | १००/- | -- |
| ९. | वैद्यकीय शुल्क | ५०/- | ५०/- |
| १०. | विद्यार्थी विमा शुल्क | १००/- | १००/- |
| ११. | जिमखाना शुल्क | १५०/- | १५०/- |
| | **(अ) एकूण** | **२३,४००/-** | **२३,३००/-** |
| | **ब) वसतीगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यासाठी फक्त** | | |
| १. | वसतीगृह शुल्क | १०००/- | १०००/- |
| २. | भांडी शुल्क | १००/- | १००/- |
| ३. | खानावळ (खानावळ ठेव) * | १०००/- | -- |
| ४. | विद्युत बिल आकार | १०००/- | १०००/- |
| | **(ब) एकूण** | **३१००/-** | **२१००/-** |
| | **(अ) + (ब) एकूण** | **२६,५००/-** | **२५,४००/-** |

***** विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम.

१. ग्रामीण शिक्षण संस्थेमध्ये जमा केलेल्या शुल्कापैकी अनुक्रमे ३ व ५ हे शुल्क विद्यापीठाकडे संस्थेने जमा करावे.

२. अनुक्रम ६ वरील जिमखाना शुल्कापैकी रुपये ५०/– विद्यापीठ, रुपये ५०/– जिल्हयाची घटक/संलग्न कृषि तंत्र निकेतन (जेथे स्पर्धा आयोजित करण्यात येतील) व रुपये ५०/– ग्रामिण शिक्षण संस्था (स्वतःकडे) जमा करावे.

ब) विद्यापीठात विद्यार्थ्याचे नामांकन करण्याकरीता ठराविक नमुन्यात आवेदनपत्र भरावे लागेल.

क) संस्था कायमची सोडून जातांना इतर सर्व राशी भरली असल्यास सुरक्षानिधी परत केला जाईल. त्यासाठी लेखी अर्ज करावा लागेल. परंतु संस्था कायमची सोडल्यानंतर ३ वर्षाच्या आत सुरक्षानिधी परत मिळविण्याबाबत अर्ज न केल्यास ही राशी परत मिळणार नाही.

**१२. आर्थिक सवलती :**

**अ) शिष्यवृत्या**

१. अनूसुचित जाती, अनूसुचित जमाती व इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सरकारच्या समाजकल्याण विभागातर्फे मिळणा–या शिष्यवृत्या मिळण्याची सोय आहे.

२. याशिवाय कर्जाउ शिष्यवृत्ती (Loan Scholarship), स्वातंत्र्य संग्राम सैनिक यांच्या मुलांना मिळणारी आर्थिक सवलत, प्राथमीक शाळांच्या शिक्षकांच्या मुलांना मिळणा–या सवलती इत्यादी आर्थिक सवलती मिळण्याची सोय आहे.

**ब) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत.**

१. ज्या अनूसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या, अर्ध भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकाचे उत्पन्न शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या उत्पन्नाच्या मर्यादे पेक्षा जास्त असल्यामुळे शिष्यवृत्ती मिळाली नसेल अशा विद्यार्थ्यांना तसेच,

२. जे अनूसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या व अर्ध भटक्या जमाती विद्यार्थी शिष्यवृत्ती घेउन त्याच वर्गात एकवेळ नापास झाले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण विभागातर्फे फी माफीची सवलत मिळू शकते.

**१३. शिष्यवृत्या व आर्थिक सवलतीबाबत काही ठळक नियम :**

१. शिष्यवृत्या व आर्थिक सवलतीकरीता वर्गातील प्रत्येक विषयामधील उपस्थितीचे प्रमाण ७५ टक्के असणे आवश्यक आहे. उपस्थितीचे प्रमाण ७५ टक्यापेक्षा कमी असल्यास विद्यार्थी सवलतीस पात्र ठरणार नाही व त्यांना विद्यालयाची फी भरावी लागेल.

२. शिष्यवृत्ती व इतर सवलतीचे अर्ज विद्यार्थ्यांना प्रवेश घेतल्यानंतर कार्यालयातून मिळू शकतील.

३. वरील सवलतीचे सर्व अर्ज विद्यार्थ्यांनी भरुन कार्यालयात, प्रवेश घेतला त्या तारखेपासून २० दिवसाचे आत सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४. शिष्यवृत्ती व सवलतीकरीता विद्यार्थी पात्रता परिक्षा ऑक्टोबंर 2019 च्या अगोदरच्या परिक्षेत उत्तीर्ण असल्यास त्यांना शिक्षणात खंड पडण्याबाबतचे मॅजीस्ट्रेटच्या सहीचे खंड प्रमाणपत्र **(Gap Certificate)** अर्जासोबत सादर करावे लागेल, अन्यथा त्यांचा अर्ज मंजूरीकरीता पाठविला जाणार नाही.

**१४. ओळखपत्र :**

प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. ओळखपत्राच्या आकाराचा फोटो कार्यालयास देउन ओळखपत्र प्राप्त करावे.

**१५. छात्रालयाची सोय :**

ग्रामीण शिक्षण संस्थेच्या छात्रालयात प्रवेश घेतांना संस्थेच्या आवेदन पत्रावर अर्ज करावा लागेल. तसेच संस्थेच्या नियमाप्रमाणे पैसे भरावे लागतील.

**१६. गणवेश :**

निर्धारित गणवेश, विद्यार्थ्यास पांढरा शर्ट व काळा पॅन्ट आणि विद्यार्थीनीस गुलाबी रंगाची साडी/ब्लाऊज/कुर्ता/सलवार/ओढणी वापरावे लागेल.

**१७. समसमान गुण असल्यास गुणवत्ता ठरविण्याबाबत :**

जर एकापेक्षा जास्त उमेदवारांच्या शालांत परिक्षेच्या गुणांची टक्केवारी व एकूण अधिभार गुणांक मिळवून एकूण गुणांची टक्केवारी सारखीच असल्यास, अशा उमेदवारांची गुणवत्ता या विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या विनियम क्रमांक एसी/१० च्या परिच्छेद क्रंमाक ९ (जी) नुसार ठरविण्यासाठी अनुक्रमे खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.

१) इयत्ता १० वी शालान्त परीक्षेतील उच्चतम गुणांची टक्केवारी.

२) कमीत कमी प्रयत्नांमध्ये इयत्ता १० वी शालान्त परीक्षा उत्तीर्ण.

३) वयाने लहान असलेला उमेदवार.

**१८. अर्जदारासाठी आवश्यक सुचना :**

१. अर्जदाराने माहीतीपत्रक व अर्ज पुर्ण वाचून नंतर सुवाच्छपणे स्वतःच्या हस्ताक्षरात अर्ज भरावा.

२. उशीरा प्राप्त झालेला अर्ज रद्द करण्यात येईल. तसेच एकदा अर्ज सादर केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही. तसेच नंतर सादर केलेले कोणतेही प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाहीत किंवा अगोदर सादर केलेले कोणतेही प्रमाणपत्र बदलता येणार नाहीत.

३. अर्जामध्ये खोटी माहीती दिली असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा खोटे प्रमाणपत्र किंवा माहीती देवून प्रवेश प्राप्त केला आहे असे निदर्शनास आल्यास प्रवेश केव्हांही रद्द करण्यात येईल.

४. उमेदवाराने सादर करावयाचे एम.सी.सी. चे प्रमाणपत्र जिल्हा समादेशक/जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीचे असणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याचा अधिभार मिळणार नाही.

५. कुठल्याही परिस्थितीत दुय्यम (Duplicate) दाखल्यावर प्रवेश दिल्या जाणार नाही, काही अपवादात्मक परिस्थितीत डुप्टीकेट प्रत विचारात घेतली जाईल. तथापी त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ) शाळा सोडल्याचा दाखला हरवला असल्यास प्रतिज्ञा पत्र सादर करावे.

ब) मुळ दाखला हरवल्या बाबतची विभागीय वर्तमान पत्रातून प्रकाशित केलेली जाहीर प्रगटनाची प्रत सादर करावी.

क) मुळ शाळा सोडल्याचा दाखला हरविल्या बाबतची पोलीसात नोंदविलेल्या तक्रारीची प्रत सादर करावी.

६. प्रवेश घेतांना सर्व मुळ प्रमाणपत्रे, मुख्यत्वे शाळा सोडल्याचा दाखला व गुणपत्रिका सादर करावी लागेल. त्याशिवाय शुल्क स्विकारल्या जाणार नाही व प्रवेश रद्द करण्यात येईल.

७. अर्जदाराने स्वतःच्या फायद्याकरीता तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी स्वतः संबंधीत संस्थेत येवून पहावी. संस्थेतर्फे कोणतीही सुचना पोष्टाने दिली जाणार नाही.

८. अर्जदाराने शालांत परिक्षेनंतर इतर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल तर त्या संस्थेचा विद्यार्थी असल्याचे प्रमाणपत्र (Bonafide Certificate) शाळा सोडल्याचा दाखल्याऐवजी सादर करता येईल. परंतु प्रवेश घेतल्यानंतर पाच दिवसाचे आंत सदर संस्थेचा दाखला (T.C.) सादर करणे आवश्यक राहील. वरील मुदतीमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्याकडून टि.सी. प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्याची राहील.

९. खालीलपैकी एका किंवा जास्त कारणास्तव अर्ज 'अपूर्ण' समजण्यात येउन रद्द करण्यात येईल.

अ) प्रवेश अर्जासोबत शुल्काची धनाकर्ष किंवा **आर.टी.जी.एस.** (RTGS) ची पावती जोडलेली नसल्यास.

ब) अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नसल्यास/अर्ज अपूर्ण भरला असल्यास,

क) शाळा सोडल्याचा दाखला जन्मतारखेसह संस्थेत/शाळेत शिकत असल्याबाबतचे मुख्याध्यापकाचे/प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडले नसल्यास,

ड) शालांत परिक्षेची गुणपत्रिका जोडली नसल्यास किंवा सर्व उपक्रमांच्या गुणपत्रिका जोडल्या नसल्यास,

ई) अर्जदार विद्यापीठ कर्मचारी असल्यास, विद्यापीठाचे सक्षम अधिका–याचे ''ना हरकत प्रमाणपत्र'' जोडले नसल्यास

फ) अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास.

१०. राखीव जागेची वर्गवारी मिळण्यासाठी सक्षम अधिका–याचा जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे. राखीव जागांची माहिती अनु. क्र. २ मध्ये माहीती पुस्तीकेत दिली आहे.

११. शालांत परिक्षेतील गुणांच्या टक्केवारीमध्ये खालील प्रमाणे जास्तीचा गुणांकाचा अधिभार मिळेल. मात्र शालांत परिक्षेच्या गुणांच्या टक्केवारीमधुन विद्यार्थ्यांच्या जास्तीच्या प्रत्येक प्रयत्नास (One point for every extra attempt) एक गुणांक कमी करण्यात येईल. ७/१२ चा उतारा सन २०२४–२०२५ किंवा २०२५–२०२६ या वर्षाचा असावा. ७/१२ चा उतारा स्वतः/आई/वडील/आजी/आजोबा (वडीलांचे आई वडील) त्यांच्या नावाचा असावा. जर आई व वडील हयात नसतील तर ७/१२ चा उतारा भाऊ किंवा काकांच्या नावाचा असावा. पण त्यासोबत स्टॅम्प पेपरवर शपथ पत्र (Affidavit) व मृत्यु प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मृत्यु प्रमाणपत्र हे सक्षम अधिकारी यांनीच प्रमाणित केलेले असावे.

| i) | एस.एस.सी. (१० वी) | शेकडा गुण |
|---|---|---|
| ii) | उमेदवाराचे आई/वडील शेत जमीनधारक (७/१२ धारक) असल्यास /शेतमजूर असल्यास तहसीलदार यांचा शेतकरी असल्याचा दाखला जोडला असल्यास. | १२ |
| iii) | इयत्ता ९ वी ते १० वीच्या वर्गात क्रिडा अथवा सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेतला असल्यास. | ०२ |
| iv) | एनसीसी, एमसीसी किंवा स्काउट मध्ये भाग घेतला असल्यास. | ०२ |
| v) | उमेदवाराची आई/वडील राज्यातील कृषि विद्यापीठामध्ये सेवेत/ सेवानिवृत्त/मृत असल्यास. | ०३ |
| vi) | एस.एस.सी. (१० वी मध्ये) ५३ एम २ (कृषि व तत्सम) हा विषय घेतला असल्यास. | ०२ |

**टिप :–** क्र. ii) ते vi) साठी जास्तीत जास्त २० गुणांचा अधिभार धरल्या जाईल.

१२. या अर्जासोबत काही आवश्यक प्रमाणपत्राचे नमुने जोडले आहेत. त्या नमुन्यानुसारच सदर प्रमाणपत्रावर सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेतलेले प्रमाणपत्र जोडावे.

१३. अर्ज भरून त्याच ग्रामीण शिक्षण संस्थेकडे **रजिस्टर्ड पोस्टाने**/ **व्यक्तिश:** सादर करावा. दुसऱ्या संस्थेत तो अर्ज जमा केल्यास रद्द समजण्यात येईल.

१४. अर्जासोबत कोणतेही मुळ प्रमाणपत्र/मुळ प्रत जोडू नये अशी जोडलेली मुळप्रत गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील व निवड न झाल्यास त्या प्रती परत केल्या जाणार नाहीत. केवळ जरुर त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिलिपी किंवा झेरॉक्स् प्रती प्रमाणीत (Attested) करुन जोडणे आवश्यक आहेत.

१५. प्रवेशाचे वेळापत्रक माहीती पुस्तीकेमध्ये दिले आहे.

अ) प्रवेशाबाबत तक्रार असल्यास संबंधीत ग्रामीण शिक्षण संस्थेतून तक्रार अर्ज विनामुल्य प्राप्त करुन तो अर्ज व्यवस्थीत भरुन संबंधीत संस्थेत निर्धारीत वेळेत रु. २५/– नगदी किंवा **आर.टी.जी.एस.** (RTGS) भरुन सादर करावा.

ब) निवड झालेल्या अर्जदाराने मुळ प्रमाणपत्रे सादर करुन व आवश्यक ते शुल्क भरुन प्रवेश घ्यावा.

क) रिक्त राहीलेल्या जागी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी संबंधीत संस्थेत मुळ प्रमाणपत्रासह व आवश्यक त्या शुल्कासह हजर रहावे व निवड झाल्यास त्वरीत प्रवेश घ्यावा.

१६. प्रवेश प्रणाली कालावधीत प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने नियम बाहय कृत्ये व बाहय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास प्रवेश प्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.

१७. **प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने ठरलेल्या वेळेच्या आत संबंधीत संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा आल्यास प्रवेश मिळणार नाही व उशिरा येण्याबाबतच्या कोणत्याही सबबीचा/कारणांचा विचार केला जाणार नाही. (उदा. पाउस होता, पूर होता, बस उशिरा आली, बस वेळेवर मिळाली नाही, आजारी होतो, पैशाची सोय नव्हती, यादी केंव्हा लागणार हे माहीत नव्हते इ.) तसेच याबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही व पत्रव्यवहारही केला जाणार नाही.**

१८. अर्जदाराचे वय **०१ जुलै २०२५** रोजी १४ वर्षापेक्षा कमी किंवा ३० वर्षापेक्षा जास्त असल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

१९. वरील नियम/सूचना इ. बाबीचा या विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या विनियम क्र.एसी/१० व महाराष्ट्र शासनाचे निर्णय विचारात घेउन अर्थ लावण्यात येईल.

२०. प्रवेशाबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतीम राहील.

*******

# ग्रामीण शिक्षण संस्था
## (व्दिवर्षीय कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रम)

### शैक्षणीक सत्र सन २०२५-२६ चे प्रवेश प्रणाली वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | प्रवेश माहीतीपत्रक व आवेदन अर्ज विक्रीची सुरुवात. | ०२.०६.२०२५ |
| २. | आवेदन अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख. | ०१.०७.२०२५ |
| ३. | सामान्य गुणवत्ता यादी व रद्द अर्जाची यादी प्रसिध्द करणे (दुपारी २ वाजेपर्यंत). | ०४.०७.२०२५ |
| ४. | सामान्य गुणवत्ता यादी व रद्द अर्जाचे बाबत तक्रार अर्ज स्विकारणे. | ०९.०७.२०२५ पर्यंत |
| ५. | तक्रार अर्ज निवारण समितीची सभा व सामान्य गुणवत्ता यादी व निवड यादी मंजूर करणे. | ११.०७.२०२५ |
| ६. | सामान्य गुणवत्ता यादी आणि निवड यादी प्रसिध्द करणे. | १४.०७.२०२५ |
| ७. | निवड यादीतील उमेदवारांना प्रवेश देणे. | १५.०७.२०२५ ते १६.०७.२०२५ |
| ८. | रिक्त जागी सामान्य गुणवत्ता यादीतील उमेदवारांना स्थळ प्रवेश (Spot Admission) देणे. | १८.०७.२०२५ |
| ९. | शैक्षणीक सत्राची सुरुवात | २१.०७.२०२५ |
| १०. | प्रवेश प्राप्त विद्यार्थी सोडून गेल्याने रिक्त झालेल्या जागी यादीतील उमेदवारांना प्रवेश देणे. | २२.०७.२०२५ |
| ११. | सदर जाहीरातीद्वारे प्राप्त अर्जाच्या कमतरतेमुळे काही जागा रिक्त असल्यास प्राचार्य ग्रामिण शिक्षण संस्था संबंधीत राजस्व विभागाच्या पात्र उमेदवारांचे परस्पर अर्ज स्विकारुन प्रवेश देतील | २८.०७.२०२५ ते २९.०७.२०२५ |

**टिप :** दि. **०२.०६.२०२५** ते **२९.०७.२०२५** चे दरम्यान तसेच वरील नमुद तारखांना सुट्टी असली/जाहीर झाली तरी संबंधीत कार्यालये सकाळी १० ते ५ पर्यंत सुरु राहतील.

## प्रवेशाकरिता तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List) ➧

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√)/ नाही (×) |
|---|---|---|
| १. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एसएससी–इयत्ता १०वी) **गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. | |
| २. | **विद्यालय सोडल्याचे** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड प्रमाणपत्र**. | |
| ३. | राज्यातील पदनिर्देषित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **'जात प्रमाणपत्र.'** | |
| ४. | राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **'जात वैधता प्रमाणपत्र.'** | |
| ५. | **उन्नत व प्रगत गटाच्या तत्वानुसार सक्षम प्राधिकाऱ्याने दिनांक ०१.०४.२०२३ नंतरचे दिलेले** किवां ३१.०३.२०२६ पर्यंत वैध असलेले **'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र'**. | |
| ६. | (अ) मा. पंतप्रधान/मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले उमेदवाराचे आई/वडील/आजी/आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'**. | |
| | (ब) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाच्या/मुलीच्या, मुलाने/मुलीने **रु. १००/– च्या मुद्रांकावर (रु. शंभर फक्त) प्रतिज्ञापत्र.** | |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत काय | |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे. | |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. | |
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. | |
| ७. | संरक्षण दलातील कर्मचारी असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेषक अधिकाऱ्याचे **'सैनिक'** असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| ८. | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य षासकीय रुग्णालय/वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.'** (**विकलांगतेची टक्केवारी** शारीरिक दृष्टया अपंग प्रवर्गकरिता आरक्षण मागणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.**) | |
| ९. | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, उमेदवाराच्या माता पित्याची अथवा आजोबा–आजीची जमीन कृषि विद्यापीठ/पाटबंधारे/वीज/संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने /पुनर्वसन अधिकाऱ्याने **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र.'** | |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | | उमेदवार किंवा त्याचे माता पिता किंवा आजोबा–आजी (पित्याकडून) शेतजमीनेचे मालक किंवा कुळ म्हणून शेतजमीन धारक आहे/आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन फक्त शेतीच आहे हे दर्षविणारे तहसिलदार/नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी).'** | |
| ११. | (१) | उमेदवाराच्या नावे किंवा आई/वडील/आजी/आजोबाच्या (वडीलांचे आई वडील) नावे शेतजमीन आहे, हे दर्षविणारा तलाठी/पटवारी याने दिलेला सन २०२४–२५ किंवा २०२५–२६ या वर्षाचा गाव ७/१२ उतारा/खसरा. | |
| | (२) | आई/वडील हयात नसल्यास, उमेदवाराचा शेतजमीनीमध्ये कायदेशीर वाटा आहे असे नमूद करण्यात आलेले जमीन धारकाचे मुद्रांकावर शपथपत्र जोडून उमेदवाराच्या भाऊ/चुलता यांचे नावे असलेला ७/१२ उतारा . | |
| | (३) | उमेदवाराच्या आईच्या वडीलोपार्जित शेतजमीनीमध्ये तिचा हिस्सा असेल तर वडीलांकडील जमीनीचा वाटा असल्याबाबतचे मुद्रांकावर केलेले शपथपत्र. | |
| १२. | | उमेदवाराच्या आई/वडिलांचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमीनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा स्पष्ट उल्लेख असणारे तहसीलदार/नायब तहसीलदाराचे **'भूमीहीन शेतमजूराचे प्रमाणपत्र'**. | |
| १३. | | एन.सी.सी./एम.सी.सी./स्काऊट/गाईड इयत्ता ८ ते १० वी पर्यंतचे मुख्याध्यापक/ तालुका समादेषक व जिल्हा समादेशक यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र. | |
| १४. | | उमेदवाराने इयत्ता ९ ते १० वी क्रिडा/सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेतला असल्यास जिल्हा क्रिडा अधिकारी/क्रिडा परिषद/जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी उमेदवाराने तालुका/जिल्हास्तरिय, राज्य/देश पातळीवर क्रिडा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा या कार्यक्रमात भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| १५. | | उमेदवाराचे आई/वडील, कृषि परिषद/कृषि विद्यापीठाचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास, संबंधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. | |
| १६. | | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र.'** | |